# मग पुढं काय झालं?

## डॉ. गौतम पंगू

अमेरिकेतल्या शाळांमध्ये मार्च हा नॅशनल रीडिंग मंथ आणि २ मार्च हा नॅशनल रीडिंग डे म्हणून साजरा केला जातो. डॉक्टर स्युस (Dr. Seuss) या मुलांसाठी अतिशय लोकप्रिय अशी जवळजवळ साठेक गोष्टींची पुस्तकं लिहिणाऱ्या लेखकाचा हा जन्मदिन. यानिमित्त इथल्या शाळांमध्ये मुलांच्या वाचनाला चालना देण्यासाठी वेगवेगळे उपक्रम आयोजित केले जातात. माझ्या मुलीच्या प्री-स्कूल क्लासमध्येही पालकांना वर्गात येऊन गोष्टी वाचून दाखवायचं निमंत्रण होतं. २ मार्च शुक्रवारी येत असल्यानं आणि शुक्रवारी मी घरून काम करत असल्यामुळं विचार केला की आपणही दुपारी जाऊन एखादी गोष्ट वाचून दाखवू. बाबा शाळेत येऊन गोष्ट वाचून दाखवणार म्हणून मुलगी फारच उत्साहात होती. आदल्या रात्री तिनं माझी रंगीत तालीमच घेतली. 'गोष्ट अशी वाचून दाखव, या पानावर माझ्या मित्रांना अशी ऍक्शन करून दाखव, इथं असा आवाज काढून दाखव' वगैरे अनेक सूचनाही केल्या. शुक्रवारी सकाळी ती शाळेत जातानाच मी वाचून दाखवणार होतो ते पुस्तक घेऊन जायला निघाली होती. बहुदा आपला बाबा धांदरट आहे आणि आयत्यावेळी पुस्तक विसरून येईल अशी तिची खात्री असावी. पण मी न विसरता पुस्तक घेऊन येईन आणि तिच्या क्लासला गोष्ट वाचून दाखवेन अशी पुनःपुन्हा खात्री करून दिल्यावर मगच ती शाळेत गेली.

पण मी जिथं काम करतो त्या कंपनीतल्या आमच्या ग्रुपला शुक्रवारची फार धास्ती असते. कारण कामातले सगळे प्रॉब्लेम्स आणि इशूज नेमके शुक्रवारीच डोकं वर काढतात. अगदी मॅनेजर इ-मेल आणि सेलफोन ऍक्सेस नाही अशा ठिकाणी सुट्टीवर गेलेली असावी, शुक्रवारी संध्याकाळपासूनच वीकेंडचा काहीतरी मस्त प्लॅन ठरलेला असावा, त्यामुळं तीन साडेतीनला लॉगऑफ करून कलटी मारायचा विचार असावा...आणि अशावेळी बरोबर दुपारी एखादा अर्जंट इ-मेल येतो आणि त्या सगळ्या प्लॅनला तिलांजली द्यावी लागते. त्यात मी काम करतो तो ग्रूप कंपनीच्या अजून मार्केटिंगची मान्यता न मिळालेल्या औषधांच्या जगभरात चालणाऱ्या वैद्यकीय चाचण्या मॅनेज करतो, त्यामुळं हे प्रॉब्लेम्स तातडीनं हाताळावेच लागतात. आम्ही ग्रुपमध्ये गमतीनं म्हणतो देखील, "Sh*t always hits the fan on Fridays!" तो शुक्रवारही याला अपवाद नव्हता. सकाळपासून अनेक अडचणी समोर दत्त म्हणून उभ्या राहिल्या होत्या. तीन-साडेतीनपर्यंत हातघाई सुरूच होती. कथाकथनाचा बेत रद्द करावा लागतो की काय अशी भीती वाटत होती. पण मग मुलीचा हिरमुसलेला चेहरा नजरेसमोर यायला लागला आणि भावी संकट टाळण्यासाठी एका कलिगला "भाई, तू संभाल ले!" अशी गळ घालून लॅपटॉप बंद केला. तरीही अगदी डे केअरच्या पार्किंग लॉटमध्ये पोचेपर्यंत त्याच्याशी फोनवर बोलतच होतो. शेवटी चार वाजले आणि फोन बंद केला म्हणजे केलाच.

तिच्या वर्गात पाऊल टाकलं तर रणकंदन माजल्यासारखी वर्गाची अवस्था झाली होती. दुपारची नॅप आणि स्नॅक झाल्यामुळं मुलं बेफाम उधळली होती. खेळणी, बाहुल्या, पुस्तकं सगळं इतस्ततः विखुरलं होतं. सगळे जोरात आरडाओरडा करत खेळत होते. आमचं कन्यारत्न मोठमोठ्यानं खिदळत डान्सच्या नावाखाली टणाटण उड्या मारत होतं आणि त्यामुळं तिच्या बाजूला बसून ब्लॉक्सनी खेळणारा एक मुलगा बिचारा घाबरून हाय अलर्टवर गेलेला दिसत होता. विचार केला, 'बाप रे! या सगळ्या जनतेला गोष्ट सांगायची?' त्यांची टीचर मात्र कोपऱ्यात अगदी शांतपणे चेक आउट टाईमची वाट बघत असल्यासारखी खुर्चीत बसली होती. मला बघताच ती मोठ्यानं म्हणाली," गाईज ,लेट्स क्लीन अप. इनायाज डॅडी इज गोइंग टू रीड अस अ स्टोरी." आणि खरोखरच सगळ्या मुलांनी दंगा थांबवून भराभर पसारा आवरला आणि सगळे सतरंजीवर आज्ञाधारकपणे बसले.  हा कायापालट बघून मी स्तिमितच झालो. टीचर निवांतपणे खुर्चीवर रेलत मला म्हणाली," यू मे स्टार्ट". मी थोडंसं अडखळतच वाचायला सुरुवात केली, पण एकदोन पानांतच मुलं आणि मी गोष्टीत रंगून गेलो. गोष्ट वाचता वाचता त्यांच्याकडं बघत होतो. टोपीविक्या आणि माकडांची गोष्ट. मुलांचे विस्फारलेले डोळे, टवकारलेले कान, चेहऱ्यावर पसरलेली निरागस उत्कंठा, टोपीविक्याच्या प्रत्येक कृतीला, माकडांच्या प्रत्येक मस्करीला मिळणारा अतिशय लोभस

प्रतिसाद. खूप छान वाटत होतं. माझी मुलगी तर नुसती माझ्या आजूबाजूला नाचत होती. तिला झालेला आनंद तिच्या चेहऱ्यावर अगदी स्पष्ट दिसत होता. गोष्ट वाचून झाल्यावर टीचर म्हणाली," आता त्यांना गोष्टीवर काहीतरी प्रश्न विचार." लहानपणी वर्गात येऊन उगाचच प्रश्न विचारणाऱ्या पाहुण्यांचा किती मनापासून तिरस्कार वाटायचा हे आठवलं आणि त्या भानगडीत काही पडलो नाही. पण मुलांना गोष्ट वाचून दाखवण्याचा फक्त १५ मिनिटांचा अनुभव मला त्या दिवसातल्या ताण-तणावांपासून कुठल्याकुठं दूर घेऊन गेला होता!

गंमत म्हणजे दुसऱ्या दिवशी न्यू जर्सी मधल्या मराठी विश्वच्या एका कार्यक्रमात मला माझी एक गोष्ट वाचून दाखवायची होती. स्वतःचं लिखाण वाचून वगैरे दाखवायचा हा पहिलाच प्रसंग. मी मुलीला गोष्ट सांगण्याच्या अनुभवावर आधारित एक गोष्ट लिहिली होती. ती मी इथं वाचून दाखवणार होतो. म्हणजे इथल्या गोष्टीतही एक गोष्ट होती. पण इथला ऑडियन्स एकदम वेगळा, सरासरी वय ५० वर्षांच्या वर असलेला, चांगल्या साहित्याची जाण असलेला. त्यांना गोष्ट कशी वाटते याची धाकधूक होती. पण एकदा समोर उभं राहून वाचायला सुरुवात केली, आणि पुन्हा कालचाच अनुभव. समोरच्यांच्या चेहऱ्यावरची उत्सुकता, डोलणाऱ्या माना, अधूनमधून पिकणारे हशे हे सगळं बघून मी निर्धास्त झालो आणि अगदी आनंदानं गोष्ट वाचून दाखवली. (नाही म्हणायला मी गोष्ट वाचायला उभा राहताच एक छोटा मुलगा "मॉमी आय वॉन्ट टू थ्रो अप!" असं म्हणून बाहेर पळाला, पण ही रिऍक्शन माझ्याशी संबंधित नसावी अशी एक करुण आशा आहे!)

ही दोन तर अगदी साधी उदाहरणं झाली. पण वय लहान असोत की मोठं, गोष्टींचं आपलं वेड कधी कमी होणार नाही. गोष्टी सांगण्याची तंत्रं आणि साधनं काळाबरोबर बदलतील, पण माणसाच्या गोष्टींबद्दलच्या आकर्षणाचा मूळ गाभा काही बदलणार नाही. बरेचदा तर आपल्याला जाणवत नसतानाही आपण गोष्टीच सांगत असतो. रुक्ष माहिती किंवा 'कोल्ड फॅक्टस' कितीही महत्वाच्या असल्या तरीही मन शोधत असतं एखाद्या रसभरीत कहाणीला! इंजिनियरिंगला असताना सेमिस्टरभर चकाट्या पिटून निव्वळ एका रात्रीच्या अभ्यासावर परीक्षेत पुरवण्यांवर पुरवण्या भरवण्यासाठी फॅक्टसपेक्षा हा गोष्टीवेल्हाळपणाच उपयोगी पडला होता. कुठलाही सेल्समन एखादी वस्तू आपल्याला विकताना तिच्यामुळं आपलं जीवन कसं सुखकर होईल याची गोष्टच सांगत असतो. कोर्टात केस लढवणारा वकील, निवडणूक लढवणारा उमेदवार, एखाद्या धर्माचा प्रसार करणारे लोक.... हे सगळे आपल्याला गोष्टी सांगूनच आपल्या भावनांना हात घालत असतात. कारण त्यांना माहीत असतं की निर्णय घेताना बरेचदा मनालाच झुकतं माप मिळतं, आणि मनापर्यंत पोचण्याचा मार्ग म्हणजे गोष्ट!

मुद्दामहून सांगणं सोडून द्या, पण आजूबाजूला नेहमी दिसणाऱ्या सर्वसामान्य दृश्यांमधूनसुद्धा कुणी न सांगताही गोष्टी डोकावत असतात. मुलाची पहिली अडखळती पावलं बघून टाळ्या पिटणारे आईवडील; ट्रॅफिक सिग्नलला तान्ह्या बाळाला कडेवर घेऊन भर उन्हात भीक मागणारी बाई; मुलीला ग्रॅज्युएशन गाऊनमध्ये पदवी स्वीकारताना बघून पाणावलेले तिच्या आईबाबांचे डोळे; रस्त्याचं काम चालू असताना दुपारी सावलीला एक साधं पोतं उशाशी घेऊन झोपलेले कामगार; नोकरी, पार्टटाइम कॉलेज आणि मूल यांची कसरत सांभाळणाऱ्या 'सिंगल मदर' ला रोजच्या बसच्या प्रवासात पाच मिनिटं लागलेली डुलकी; सिनियर लिव्हिंग फॅसिलिटीमध्ये भेटायला आलेला नातू घरी जाताना आजोबांच्या डोळ्यात उभे राहिलेले असहाय अश्रू; बसस्टॅन्ड, रेल्वे स्टेशन्स आणि एअरपोर्टवर घेतले जाणारे निरोप आणि होणारी स्वागतं... प्रत्येक दृश्याच्या मागं एक गोष्ट असते. डोळे उघडे ठेवून वाचायला लागलं की 'किती वाचू आणि किती नको' असं होऊन जातं. पण एक मात्र खरं आहे, जगाच्या अंतापर्यंत आपण या गोष्टी ऐकत रहाणार, वाचत रहाणार, बघत रहाणार, त्यातून अर्थ आणि ओळखीचे पॅटर्न्स शोधत रहाणार आणि वास्तवातल्या किंवा कल्पनेतल्या स्वतःचा आणि या गोष्टींचा 'रेझोनन्स' साधण्याचा प्रयत्न करत रहाणार!

पण मग या सगळ्या छोट्याछोट्या गोष्टी कुठल्यातरी एका मोठ्या गोष्टीच्या आत घडत असतील तर? माणसाचा त्याच्या गोष्टी घडवून आणायच्या सामर्थ्यावर कितीही विश्वास असला, तरी हे सगळं कुणीतरी एका वेगळ्याच गोष्टीत लिहिल्याप्रमाणे होत असेल तर? आपणही खरंच 'आहोत' हे कशावरून? की हे आपलं फक्त एकमेकांनाच

जाणवणारं आभासी अस्तित्व आहे? आणि आपण खरं तर कुणाच्यातरी कल्पनेतली नुसती पात्रं आहोत? कदाचित या सगळ्या महाकथेचा रचिता कुणीतरी वेगळाच असेल.  कल्पना करा, संध्याकाळची वेळ असेल, तो एखाद्या शांत ठिकाणी आजूबाजूला जमलेल्या लोकांना ही गोष्ट सांगत बसला असेल. मोठी अद्भुत आणि रोमांचकारी गोष्ट, आपल्या विश्वाची गोष्ट... विश्वातल्या असंख्य गॅलेक्सीज, त्यातली मिल्की वे नावाची एक छोटीशी गॅलेक्सी, त्यातला एक सूर्य नावाचा एक किरकोळ तारा, त्याभोवती फिरणारा पृथ्वी नावाचा एक अजूनच किरकोळ ग्रह, त्या ग्रहावर उदयाला आलेली जीवसृष्टी, त्यातला माणूस नावाचा प्राणी, त्यानं निर्माण केलेली संस्कृती, त्यानं केलेली प्रगती, त्यामुळं त्याच्यात उत्पन्न झालेला 'मी पणा, या सगळ्या सगळ्याची गोष्ट… लोक अगदी रंगून जाऊन त्याची ही गोष्ट ऐकत असतील आणि सांगताना क्षणभर उसंत घ्यायला तो थांबला की म्हणत असतील," थांबलास का? सांग ना, मग पुढं काय झालं?"